महाराष्ट्र टाईम्स 15 JUL 2016 जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आज युवा कौशल्य कार्यशाळा



**कोल्हापूर:** शिवाजी विद्यापीठांतर्गत कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र यांच्यामार्फत येत्या १५ जुलै रोजी जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त सकाळी ११ ते १ या वेळेत 'आईस ब्रेकिंग फॉर स्किल डेव्हलपमेंट' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये विकसित करण्यासाठी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये या अंतर्गत मार्गदर्शन केले जाणार आहे.

विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी.आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या कार्यशाळेत दोन व्याख्याने व प्रात्यक्षिके दाखवण्यात येणार आहेत. 'स्किल डेव्हलपमेंट इनिशिएटीव्ह अँड इफेक्टीव्ह कम्युनिकेशन स्किल' या विषयाबाबत विशेष मार्गदर्शन करण्यात येईल.

कार्यशाळेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी १५ जुलै (शुक्रवार) रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी समन्वयक डॉ.ए.एम.गुरव (९८५००१२५४५) यांच्याशी संपर्क साधावा.

पुण्यनगरी 15 JUL 2016 जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक युवा कौशल्यदिनानिमित्त विद्यापीठात आज कार्यशाळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठांतर्गत कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र यांच्यामार्फत १५ जुलै रोजी जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त सकाळी ११ ते १ या वेळेत 'आईस ब्रेकिंग फॉर स्कील डेव्हलपमेंट' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये विकसित करण्यासाठी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये याअंतर्गत मार्गदर्शन केले जाणार आहे. विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या कार्यशाळेत दोन व्याख्याने व प्रात्यक्षिके (डेमॉन्स्ट्रेशन) होतील. 'स्कील डेव्हलपमेंट इनिशिएटिव्ह अँड इफेक्टिव्ह कम्युनिकेशन स्कील' या विषयाबाबत विशेष मार्गदर्शन करण्यात येईल. कार्यशाळेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी १५ जुलै (शुक्रवार) रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी केले आहे.

लोकमत 15 JUL 2016 जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'गुरुशिष्य परंपरा' उद्यापासून

**कोल्हापूर :** उस्ताद विलायत खाँ साहेब आणि त्यांचे गुरु पं. अरविंद पारिख या गुरुशिष्य जोडीचे संगीतक्षेत्रातील योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचावे यासाठी शनिवारी आणि रविवारी (दि. १६ व १७) गुरुशिष्य परंपरा महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती वादक वरदराज भोसले याने गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, गुरुपौर्णिमेच्या औचित्याने होत असलेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाच्या शाहू सभागृहात शनिवारी सकाळी साडेनऊ वाजता विद्यापीठाचे बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी रजिस्ट्रार डॉ. व्ही. एन. शिंदे आणि विद्यापीठाचे संगीत विभागप्रमुख डॉ. एन. व्ही. चिटणीस यांची प्रमुख उपस्थिती असेल.

उद्घाटनानंतर हसन हैदर खान, वरदराज भोसले, हरप्रीत हसरत, अश्विन दळवी, परेश पारेख, निशाद मिस्त्री, सुभाष मिश्रा, दनिश खान, गुणाकली भोसले, अमृता कुलकर्णी, अल्ताफ खान, राजीव जनार्दन, पूर्वी पारिख, सुंदर नाथ, रफत खान, आदी शिष्य आपली कला सादर करणार आहेत. दुसऱ्या दिवशी (रविवारी) अजित किंतुरे, वर्षा सोहले, तुषार भाटिया, नितीन परमार, अमृता मोरे, शोभित नहार, पुलक लाहिरी, मधुरा करंबळेकर, संजय संत, ज्ञानेश अमलादी, रामकृष्ण दास, भूपाल पणशीकर, विजय गोनाहल्ल, निशिता तांबे, भट्टाचार्य, आदी कलाकार आपली संगीत कला सादर करणार आहेत. तरी रसिकांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेला प्रतिज्ञा नाट्यरंगचे प्रशांत जोशी, नरेंद्र भोसले, नम्रता भोसले उपस्थित होत्या.

महाराष्ट्र टाईम्स 15 JUL 2016 जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॉलेज गाइडना पुन्हा यूजीसीची मान्यता

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

एम.फील.,पीएच.डी.साठी महाविद्यालयीन मार्गदर्शकांना मान्यता देण्यासाठीची विद्यापीठ अनुदान आयोगाची (यूजीसी) नवी अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

युजीसीने गेल्यावर्षी केवळ पदव्युत्तर संस्थांमधील नियमित शिक्षकांनाच मार्गदर्शक म्हणून मान्यता देण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे महाविद्यालय स्तरावरील मार्गदर्शकांची तसेच संशोधक विद्यार्थ्यांची मोठी अडचण झाली होती. ही नव्या अधिसूचनेमुळे दूर झाली आहे. यासंदर्भात शिवाजी विद्यापीठाने गेले वर्षभर सातत्याने या विषयी युजीसीकडे पाठपुरावा केला. देशातील ६००हून अधिक विद्यापीठांसह हजारो महाविद्यालयांसमोर निर्माण झालेला संशोधन मार्गदर्शकाविषयीचा पेच यातून दूर झाला आहे. यात शिवाजी विद्यापीठाने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली.

यूजीसीने एम.फील.-पीएच.डी. पदवी प्रदान करण्याबाबत किमान मानदंड व प्रक्रिया विनिमय - २०१६ ही सन २००९च्या अधिसूचनेला अधिक्रमित करणारी अधिसूचना जारी केली आहे. मान्यताप्राप्त विद्यापीठाचा नियमित शिक्षक, ज्याचे संदर्भित पत्रिकेमध्ये किमान पाच शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत; आणि विद्यापीठ, महाविद्यालयातील नियमित सहयोगी/ सहाय्यक प्राध्यापक, जो पीएच.डी. धारक असेल, ज्याचे किमान दोन शोधनिबंध प्रकाशित झाले असतील, त्यांना मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली आहे.

